**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबूराव नारायण काटे
ह.भ.प.शांतीनाथ महाराज मठामागे, लिंक रोड,
पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर
(२) **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
उजनी कालवा विभाग क्र.७, पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८+२२८ / सोलापूर / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००८ (अ.क्र.११८ वि.अ.नि.का.)<br>दि.१९.११.२००८(अ.क्र.२२८) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबूराव नारायण काटे
ह.भ.प.शांतीनाथ महाराज मठामागे, लिंक रोड,
पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर श्री.र.प्र.लांडेकर
(१)**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
भीमा कालवा मंडळ, सोलापूर श्री.द.भु.बुक्का

(२) **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
उजनी कालवा विभाग क्र.७, पंढरपूर, जि.सोलापूर श्री.नि.रे.कारीमुंगी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.६.२००६ (अ.क्र.११८)<br>दि.१५.६.२००६ (अ.क्र.२२८) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.७.२००६ (अ.क्र.११८)<br>दि.२८.६.२००६ (अ.क्र.२२८) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.८.२००६ (अ.क्र.११८)<br>दि.१८.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.९.२००६ (अ.क्र.११८)<br>दि.२०.११.२००६ (अ.क्र.२२८) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अपील क्र.११८**<br>दि.२४.८.२००४ ते अर्जापर्यंतची माहिती. श्री.बी.एन.काटे,कनिष्ठ लिपिक यांची या विभागातून बदली करणे-दि.२३.१२.२००४ च्या पत्रास अनुसरुन दि.२७.१२.२००४ ला खुलासा सादर केला आहे.त्यानुसार चौकशी केली किंवा नाही, याबाबत चौकशी अहवाल देण्यात आलेला नाही. तसेच कार्यकारी अभियंता यांचे दि.११.२.२००५ च्या पत्रास दि.१५.३.२००५ रोजी खुलासा तथा विनंती अर्ज मी दिला. याबाबत मला कहीही कळविण्यात आले नाही. दि.२५.७.२००६ अन्वये सर्व अर्जावर बदलीची कार्यवाही केली असे कळविले ते चुकीचे व अन्यायकारक आहे. कर्मचाऱ्यांनी निवेदनात केलेल्या आरोपाच्या कागदपत्रांच्या प्रती, पोलीस आयुक्त, भ्रष्टाचार प्रतितिबंधक कार्यालय, सोलापूर यांच्याकडील अर्जावर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत. मंडळाकडे केलेल्या विविध अर्जांवर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती. श्री.पी.बी.कोळी, अधीक्षक यांचा सेवानिवृत्तीचे वेळी शिल्लक रजेचा तपशील, त्यांना दिलेल्या आर्थिक लाभांची माहिती, श्री.ए.जे.गवळी, कनिष्ठ लिपीक यांची बदलीबाबत प्रस्ताव किंवा कार्यकारी अभियंता यांचे शिफारसपत्र किंवा विनंती अर्ज, श्री.पुरी, अधीक्षक अभियंता यांच्या कार्यकालातील त्यांनी घेतलेली प्रवासभत्ता देयके, लॉगबुक प्रत, तसेच त्यांनी केलेल्या बैठकांच्या तारखा व कार्यालय. श्री.ब.ल.बायस, उपकार्यकारी अभियंता यांच्या गैरहजेरीबाबत मंडळ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा सर्व पत्रव्यवहार. महाराष्ट्र कृष्ण विकास महामंडळ, पुणे यांना केलेल्या पतपत्राची मागणी व पाठविलेल्या पत्राच्या प्रती (सर्व शीर्षकामे व वेतन, कार्यालयीन खर्च, इंधन प्रवास भत्ता-जानेवारी २००४ ते ३१.१२.२००५ अखेर), महामंडळ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पतपत्राच्या आदेश, तसेच पतपत्र नोंदवहीची छायांकित प्रत,वरील कालावधीत अतांत्रिक कर्मचारी यांच्या केलेल्या बदल्यांचे आदेश व प्रती.<br>**अपील क्र.२२८**<br>सोबत पान क्र.१ ते ६ प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बी.एन.काटे यांनी स्वत:च्या बदलीच्या अनुषंगाने इतर काही कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील कागदपत्रासह १२ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती अपूर्ण, विलंबाने व दिशाभूल करणारी मिळाली, अशा कारणावरुन श्री.काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

भिमा कालवा मंडळ, सोलापूर या कार्यालयात भ्रष्टाचाराशिवाय कामच होत नाही. आपण दिलेले विनंती अर्ज मंडळ कार्यालयाने दाबून ठेवले. भ्रष्टाचारात आपण सहभागी होत नसल्यामुळे आपल्याविरुध्द कारवाई केली गेली, इ. बाबी श्री.काटे यांनी लेखी निवेदनात विस्तृत स्वरुपात नमूद केले आहेत.

दि.१९.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीतही त्यांनी त्याचाच पुनरुच्चार केला.

श्री.काटे यांनी मागितलेली माहिती विस्तृत असून त्यांनी वेळावेळी केलेल्या अर्जांनुसार सर्व माहिती विहित मुदतीत देण्यात आली आहे. नेमकी कोणती माहिती त्यांना हवी आहे हे जेथे स्पष्ट होत नव्हते, तेथे त्यांना अभिलेखाचे अवलोकन करुन देऊन सर्व प्रती देण्यात आल्या आहेत. सर्व अभिलेखचे स्वत: अवलोकन करुन प्रती घेतलेल्या असतानाही खोटी माहिती मिळाल्याचे त्यांचे म्हणणे योग्य नाही. तसे त्यांना पूर्वीही कळविलेले आहे. मूळ अर्जापेक्षा अपिलात त्यांनी अतिरिक्त माहिती मागितल्यानंतर तीही देण्यात आली आहे. विहित मुदतीत त्यांना ८३५ पृष्ठांची माहिती व अतिरिक्त मागणीनुसार ४८४ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे. सर्व माहिती मिळाल्याचे नमूद करुन आपली तक्रार राहिली नसल्याचे पत्र त्यांनी दि.२.१२.२००६ रोजी दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.नि.रे.कारीमुंगी व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री.र.प्र.लांडेकर यांनी श्री.काटे यांच्या संबंधित पत्राच्या प्रतीसह प्रतिपादन केले. त्यानंतरही पूर्ण माहिती न मिळाल्याची तक्रार श्री.काटे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केल्याचे कळल्यानंतर दि.११.१२.२००७ रोजी त्यांना पत्र पाठविले व

अद्याप माहिती राहिली असल्याचे म्हणणे असल्याचे कळवावे, त्याप्रमाणे माहिती देण्यात येईल असे कळविले, असे जन माहिती अधिकारी श्री.द.भु.बुक्का यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले. श्री.काटे मंडळा अंतर्गत कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत, त्यामुळे आवश्यक असलेली सर्व माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकते, असेही प्रतिपादन त्यांनी केले. आपल्याला ३१२३.७५ रुपये जमा करण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. एवढी रक्कम भरण्यास नकार देऊन आपण रु.२५२६/- भरले. एवढी पाने नसताना आपल्याला ही रक्कम विनाकारण भरण्यास भाग पाडले व जवळजवळ एक महिने चार दिवसांनी कागदपत्रे दिली, तीही अपूर्ण दिली. जादा भरावयास लावलेले रु.११९२/- चा डी.डी. आपल्याला नंतर परत दिला, असे श्री.काटे यांनी सांगितले.

श्री.काटे यांना रु.२५२६ चे डी.डी. परत करण्यात आले व आवश्यक त्या कागदपत्रांचे शुल्क घेण्यात आले, असे जन माहिती अधिकारी श्री.द.भु.बुक्का यांनी स्पष्ट केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.काटे यांना माहिती देण्यात आली आहे. उपकार्यकारी अभियंता श्री.ब.ल.बायस यांना गैरहजर असताना ३३ महिने पगार दिला, आपल्यावर बदलीबाबत अन्याय केला गेला, असे आक्षेप श्री.काटे यांनी विस्ताराने नोंदविले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्याची दखल घेता येणार नाही.

याच विषयाबाबतची सुमारे १०० मुद्दे व उपमुद्दे असलेली माहितीची मागणी श्री.काटे यांनी दि.१५.६.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उजनी कालवा, क्र.८, सोलापूर यांच्याकडे केली होती. दि.१९.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली. माहिती मागितल्यापासून ३३ महिन्यांच्या कालावधीत आपल्याला फक्त ठराविक छायांकित प्रती मिळाल्या, बाकीच्या जाणीवपूर्वक दिल्या गेल्या नाहीत, असे प्रतिपादन श्री.काटे यांनी केले. श्री.काटे यांनी स्वतः कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असतानाच्या काळातीलच विस्तृत माहिती मागितली आहे. पाच वर्षांच्या काळातील या माहितीसाठी एक लाख

पंचेचाळीस हजार रुपये शुल्क भरण्यास त्यांना कळविण्यात आले होते. शुल्क भरण्याऐवजी अभिलेखाचे अवलोकन करण्याची मागणी त्यांनी केली, त्यानुसार त्यांना अवलोकन करु देण्यात आले. त्यानंतर त्यांनी नमूद केलेल्या माहितीसाठी शुल्क भरुन घेऊन त्यांना माहिती देण्यात आली व शुल्काची जादा केलेली रक्कम परत करण्यात आली. श्री.काटे ज्या कार्यालया संबंधाने माहिती मागत आहेत ते कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.७, पंढरपूर हे कार्यालय दि.३०.४.२००७ अखेर बंद झाले आहे व त्या कार्यालयाचा कार्यभार कार्यकारी अभियंता, उजनी कार्यालय क्र.८ यांच्याकडे वर्ग झालेला आहे. जुने अभिलेख शोधून संकलित करुन माहिती देण्यात कार्यालयीन यंत्रणेचा बराच वेळ जाऊनही ती माहिती देण्यात आली आहे. श्री.काटे वारंवार तीच मागणी करीत असून वेळोवेळी त्यांना माहिती दिली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.नि.रे.कारीमुंगी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.मं.हिं.ठाकूर यांनी केले. त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर देण्यात आले असून वेळावेळी त्यांनी मागणी केल्यानुसार अभिलेखाचे अवलोकन करु देण्यात आले आहे. मात्र भाष्य व आरोप करुन त्याच बाबींची माहिती पुनःपुन्हा विस्ताराने मागणे सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती अकारण खर्ची घालणारे आहे. ते करु नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.४.९.२००९

③ पृष्ठ क्र ७ ते ८ ⑦

४] हवी असलेल्या माहितीचा तपशील.

१] मा. सु.व. प्रदक्षिणे, कार्यकारी अभियंता, राजपत्रित अधिकारी [सुपर क्लास वन] यांचा कालावधी, सदरच्या कालावधीमध्ये देण्यात आलेले वेतन व भत्ते, प्रवासभत्ता इ. आर्थिक रक्कमा यांचा तपशिल मिळावा.

२] त्यांनी उपभोगलेल्या सर्व रजांचे का.आदेश, किरकोळ रजा अर्ज, डेरॉक्स डायरी प्रवासभत्ता देयके, इ.

३] मा. ब.ल. बायस, उप कार्यकारी अभियंता, राजपत्रित अधिकारी यांचा कालावधी तसेच त्यांना देण्यात आलेले वेतन व भत्ते इ. सर्व तपशिलासह प्रवासभत्ता देयक व आर्थिक रक्कमा इ. सर्व तपशील प्रती मिळाव्यात.

✓अ] अधिकाराचे हस्तांतरण केलेला आदेश प्रत [ Delegation of powers ] व उप कार्यकारी अभियंता यांची कामे इ. माहिती मिळावी.

✓ब] दररोज कार्यालयात कागदपत्रांवर केलेल्या सहयांची कमीत कमी ५ कागदपत्रांच्या प्रती किंवा हजर झालेपासून अद्यापपर्यन्त केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती.

✓क] गैरहजर कालावधीत विनापरवाना कार्यालयात अनुपस्थित असलेबाबतचा संपूर्ण पत्रव्यवहार [ विभागीय कार्यालय, मंडळ कार्यालय इ. ] संबंधिताच्या खुलासा प्रती व त्यावर विभागीय कार्यालय/ मंडळ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा सर्व कागदपत्रांच्या प्रती. [ सर्वसाधारण व गोपनीय]

✓ड] रजा कालावधी, किरकोळ रजा, अर्जित रजा, परावर्तीत रजा वैद्यकीय रजा विना वेतन इ. तपशिलाच्या प्रती. दि. १/९/२००२ ते आतापर्यंन्त

इ] कार्यालयात गैरहजर असतांना राजपत्रीत अधिकारी यांनीच पगार देण्यात येतो याबाबत शासनाच्या निर्णयाची प्रत मिळावी.

✓ई] उप कार्यकारी अभियंता यांची कर्तव्य व जबाबदारी याबाबत थोडक्यात माहिती मिळावी. [ शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या पुस्तकानुसार/ शासननिर्णयासह

× प्र] शासकिय निवासस्थान मिळणेबाबतचे अर्जाची प्रत व निवासस्थान देण्यात आलेल्या बाबतचे कार्यालयीन आदेशाची प्रत मिळावी.

✓ ग] श्री. पी.डी. शिंदे, उप कार्यकारी अभियंता साहेब यांना देण्यात आलेल्या आदेशाची प्रत .

×४] अ] सेवापुस्तक पडताळणी पथक पुणे यांनीच देण्यात साठी पगारातुन सक्तीने अनाधिकृतपणे पैसे घेणेबाबतचा अर्ज दि. २४/८/२००४ यावर मा. कार्य.अभि. साहेब यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची आतापर्यंतची सर्व कागदपत्रांच्या प्रती. [सर्वसाधारण/गोपनीय] संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात आलेली समज, ज्ञापन, शिस्तभंग, तसेच अर्जामध्ये तक्रारीबाबतचे खुलासापत्रे यांच्या प्रती. कर्मचाऱ्यांकडुन घेतलेल्या पैशाची यादी.

ब] श्री. बी.एन. काटे, क. लिपीक यांचेवर करण्यात आलेल्या कारवाईच्या प्रती. उदा. समज, ज्ञापन, शिस्तभंग, इ. सर्वसाधारण/ गोपनीय [ विभाग / व मंडळ]

क] मंडळ कार्यालयाकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रती. [साधारण/गोपनीय

ड] मंडळ कार्यालयास पाठविलेल्या अर्जाच्या प्रती पत्राच्या प्रती.

इ] पैशासाठी भ्रष्टाचारासाठी वेतन थकीत ठेवलेबाबत तक्रारीअर्जावर करण्यात आलेल्या सखोल चौकीशीचा अहवाल.

ई] श्री. व्ही.एन. भाने, दा.चालक यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत व तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती.

फ] श्री. काटे यांच्या अर्जाबाबत संबंधित कर्मचा-यांचा कार्यभार बदलणेबाबतच्या पत्रांच्या प्रती. त्यावर विभागाने केलेल्या कार्यवाहीची प्रत [साधारण/ गोपनीय] पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती मिळावेत.

ग] लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, सोलापूर यांनी केलेल्या कार्यवाहीच्या प्रती, मंडळ कार्यालयाच्या प्रती, विभागीय कार्यालयाच्या प्रती, खुलासा अहवाल प्रती.

५] अ] पोस्टाची आर.डी.ची रक्कम भरलेबाबतच्या कर्मचा-यांची यादी जानेवारी-२००३ ते ३१ डिसेंबर-२००५ प्रत्येक महिन्याच्या यादी पोष्टाच्या शिक्क्यासह.

ब] मुख्यमंत्री सहाय्यता सर्व निधी [दुष्काळ निवारण] देण्यात आलेल्या रक्कमेची यादी. उपविभाग/ व विभाग इ. सर्व. मा जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या डी.डी.ची झेरॉक्स.

क] ध्वजनिधी यादीस जमा रक्कम विभाग/ उपविभाग सर्व सन जानेवारी-२००२ ते ३१/१२/२००५

ड] गोपनीय अहवालाबाबत उत्कृष्टव अतिउत्कृष्ट शेरा दिलेल्या कर्मचा-यांच्या व गोपनीय अहवालाच्या प्रती.

६] अ] श्री. बी.एन. काटे, क.लि. यांची या विभागातून वा अन्य विभागात बदली करण्याबाबतच्या निवेदनाची प्रत, व निवेदनावर मा. कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या कार्यवाहीच्या सर्व प्रती. [सर्वसाधारण/ व गोपनीय]

ब] श्री. काटे, क.लि. यांचेवर विभागीय कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रती. उदा. ज्ञापन, मेमो, शिस्तभंग, समज. इ.

क] मंडळ कार्यालयाकडून निवेदनावर करण्यात आलेल्या आतपर्यंतच्या प्रती. [सर्वसा./गोपनी

ड] निवेदनात केलेल्या आरोपाच्या पुष्ठयर्थ अर्जाच्या प्रतीस, किंवा इतर कागदपत्राच्या प्रती. उदा. सर्वनोट इ.

इ] मंडळ कार्यालयाने केलेल्या चौकशीचा अहवाल

७] अ] फक्त आंतरिक कर्मचा-यांची माहिती मिळावी.

अ] दि. १/७/२००० ते ३१/३/२००६ अखेर उजनी कालवा विभाग क्रं.७, पंढरपूर व उजनी कालवा विभाग क्रं.५, पंढरपूर येथे बदलून आलेल्या व बदलून गेलेल्या सर्व कर्मचा-यांच्या आदेशाच्या प्रती. सर्व उपविभागांसह तसेच पुनर्वसन पथक यांचीही माहिती यावी.

ब] कर्मचा-यांची स्थिती दर्शविणारे माहिती दर्शविणारे मासिक विवरणपत्र. माहे ७/२००० ते ३१/३/२००६ अखेर.

क] बदलून आलेल्या कर्मचा-यांची काम वाटपाचे आदेश प्रती. दि. १/७/२००० ते ३१/३/०६ व विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेल्या [कामवाटप] कामाचे कार्या. आदेश.

क] कामाशिवाय बसवुन ठेवण्यांत आलेल्या कर्मचा-यांची यादी, दि. १/७/२००० ते ३१/३/२००६ त्यांना देण्यांत आलेल्या ~~xxxxxxxx~~ [विभाग क्रं. ७ व विभाग क्रं. ५ ]

ड] आस्थायी असस्थापना, रुपांतरीत अस्थायी आस्थापना यांचे मासिक पगार देयक जानेवारी-२००३ ते ३१/१२/२००५ सर्व प्रती.

इ] प्रकल्पभत्ता मंजूर केलेल्या आदेशाच्या प्रती

ई] सी.आर.टी. कर्मचा-यांची फरकांची रक्कम अदा केलेल्या व म.नि. निधीमध्ये जमा केलेल्या आदेशाच्या प्रती धनादेश क्रं. दिनांक इ. प्रती.

फ] १/१/२००१ ते ३१/१२/२००५ पर्यन्त सी.आर.टी. वरील आलेल्या कर्मचा-याचे शासनाचे आदेश प्रती.

म] वेतन अदा करतांना जमा व वसुल केलेल्या नोंदवहीची झेरॉक्स प्रती. जानेवारी-२००० ते ३१/१२/२००५ अखेर.

७] दुरध्वनी नोंदवहीची झेरॉक्स प्रत. ७/२००३ ते ३१/१२/२००५ पर्यंत

८] श्री. अे.जे. मवळी, वरिष्ठ लिपीक यांनी सेवापुस्तकांचा कार्यभार दिलेल्या कार्यभाराची यादी.

९] वेतन देयक कार्यभाराची यादी.

१०] हजेरीपत्रक| उशिराबाबतचे हजेरीपत्रक दि. झेरॉक्स प्रती १/१/२०००ते ३१/१२/२००५

११] किरकोळ रजा नोंदवही दि. १/७/२००० ते ३१/१२/२००५ .

१२] आवक नोंदवही दि. १/११/२००२ ते ३१/१२/२००५ प्रती

१३] जावक नोंदवही दि. १/१/२००२ ते ३१/१२/२००५. प्रती

१४] गोपनीय आवक जावक नोंदवही प्रती दि. ३१/११/२००१ ते ३१/१२/२००५.

१५] रजेच्या मंजूरी आदेशाच्या प्रती जाने. २००२ ते ३१/१२/२००५ अखेर प्रती.
[ अर्जित रजा, परावर्तीत रजा, विनावेतन इ. सर्व ]

१६] ए.रोल झेरॉक्स प्रती विभागीय कार्यालय व उपविभाग आष्टी दि. जाने.२००२ ते ३१/१२/२००५.

१७] अर्धशासकीय नोंदवहीची प्रती झेरॉक्स जाने.२००२ ते ३१/१२/२००५ पर्यंत.

१८] दुरध्वनी बिलाच्या प्रती. दुरध्वनी क्रं.२२३१७४ व २२३२२० ची माहे ७/२००२ ते ३१/१२/२००५

<u>पतपत्र</u>

८] अ] स्थापना पतपत्राची मागणी/ मासिक / पुरवणी जाने.२००२ ते ३१/१२/२००५

ब] आस्थापना पतपत्र पत्राच्या प्रती. ———"——— ———"———

क] श्री. गिड्डे, मंजूर व इतर कर्मचा-यांबाबत केलेल्या पतपत्र नोंदवही प्रती. जाने. २००२ ते ३१/१२/२००५.

ड] मा. कार्यकारी अभियंता यांना घरी फोन वापरण्यास परवानगी असलेल्या शासन निर्णयाची प्रत.

इ] ख्याति काटकसर शासन निर्णय परिपत्रक प्रत मिळावी.

[ क्रमशः पान ५ वर पहा ] ..

ई] मा. कार्यकारी अभियंता यांना खर्च करण्यास अधिकारी पत्र शासन निर्णय प्रत.

उदा. शिर्षकामे, कार्यालयीन खर्च इंधन वाहन दुरुस्ती इ.

फ] आस्थापना रोखवहीची झेरॉक्स प्रत. जाने. २००२ ते ३१/१२/२००५.

म] इन्कबनती रजिस्टर ची झेरॉक्स प्रत जाने. ~~२००४~~ २००५ ते ३१/१२/२००५. पर्यंत

ग] नियतकालिक बदल्याबाबतची माहिती जाने. २००२ ते ३१/१२/२००५ झेरॉक्स प्रती.

लेखाशाखा :

अ] लेखाशिर्ष कामे [ Head works ] दि. १/१/२००२ ते ३१/१२/२००५.

ब] मेमो ऑफ चेक ड्रॉन [ memo de cheque withdrawn ] -"-

क] वर्क गोषवारा तक्ता जमा बाजू व खर्च बाजू दि. १/१/२००२ ते ३१/१२/२००५.

ड] पतपत्राची मागणी शिर्षकामे, १/१/२००२ ते ३१/१२/२००५

इ] पतपत्राची नोंदवही जाने. १/१/२००२ ते ३१/१२/२००५.

ई] पतपत्र मंजूर आदेशाच्या प्रती. -"-

फ] सी.आर.टी. आस्थापनेचा खर्च, कामावर खर्ची घातलेबाबतचा टी.बी.आय.ची प्रत वर्ष २००१ ते २००५.

म] कार्यालयीन खर्च प्रत्येक महिन्याच्या झेरॉक्स प्रत दि. १/७/२००२ ते ३१/१२/२००५.

ठेव नोंदवही :- [सुरक्षा अनामत ]

कंत्राटदाराची

अ] कंत्राटदाराची सुरक्षा / अनामत रक्कम परत केलेल्या मागणी केलेल्या पतपत्राची मागणी प्रती.

ब] पतपत्र मंजूर झालेनंतर अनामत रक्कम/ सुरक्षा रक्कम परत केलेल्या हातपावतीच्या पुस्तकाची प्रत.

क] दिलेल्या चेक, मेमो चेक ड्रॉनची प्रत.

ड] चेक पोस्टाने पाठविलेल्या प्रती. (पर्यायाने)

क निविदा

अ] निविदा नोंदवही झेरॉक्स प्रत वर्ष २००१ ते २००५ अखेर. [मा. मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता/ कार्यकारी अभियंता यांनी स्वीकारलेल्या एल.सी.बी. ब-१, ब-२, अ-१ [illegible] स्वीकारण्यात आलेल्या निविदांची तुलनात्मक दर तक्ते प्रत. वर्ष २००१ ते २००५.

[illegible] दिश प्रती.

क] वर्तमानपत्रात दिलेल्या निविदा सुचनांच्या प्रती, मंडळ कार्यालयाकडून मंजूरी मिळालेल्या पत्राच्या प्रती. टेंडर विकलेल्या प्रती. [कोरे ] नोंदवहीची झेरॉक्स प्रती सन जाने. २००२ ते ३१/१२/२००५.

भविष्य नि. निधी उचल.

अ] भ. नि. निधी ब्रॉडशिटची झेरॉक्स प्रत. सन २००२ ते ३१/३/२००६ अखेर.

ब] १२ महिने पूर्ण झाले नसतानां देण्यात आलेल्या भ. नि. नि. आदेशाची प्रती. जाने. २००२ ३१/१२/२००५

ड] उपविभागाकडून आलेल्या अर्जावर विभागीय कार्यालयात देण्यात आलेल्या म. नि. नि. ची उचल अर्जाची प्रत व आदेशाच्या प्रती माहे ७/२००२ ते ३१/१२/२००५.

इ] विभागीय कार्यालयात देण्यात आलेल्या रक्कमाच्या ए. रोलच्या झेरॉक्स प्रत उदा. म. नि. नि. पुरवणी देयक रक्कम, महागाई भत्ता, प्रवास भत्ता देयक, व इतर भत्ता इतर पुरवणी रक्कम दिलेल्या ए. रोलची झेरॉक्स प्रत वर्ग-४ कर्मचाऱ्यांना देण्यात व्याजाची रक्कम इ. चे वार्षिक विवरणपत्र , विवरणपत्र मंडळ कार्यालयास पाठविलेले पत्राच्या झेरॉक्स प्रती. सन १/४/२००२ ते ३१/३/२००६ अखेर.

ई] प्रत्येक म. नि. निधीचे पुस्तक देणेत आलेबाबत रजिस्टरची सहयांची झेराक्स प्रत व उप विभागास पाठविलेली प्रत. (पत्राची)

फ] म. नि. निधीतुन उचल रक्कम मंजूर केलेल्या नोंदवहीच्या झेरॉक्स प्रती. सन २००२ ते ३१/१२/२००५ विभाग क्रं. ७ व विभाग क्रं. ५ वर्ग-३ व वर्ग-४ इ. सर्व.

म] कोषागारात देयके सादर करावयाच्या नोंदवहीची झेरॉक्स प्रत जाने. २००२ते २००५

प्रवास भत्ता देयक.

अ] प्रवासभत्ता मंजूर गोषवारा झेरॉक्स प्रत सन जाने. २००२ ते ३१/१२/२००५.

ब] प्रवास भत्ता पतपत्र मागणी प्रत. ---"---

क] प्रवास भत्ता अनुदान प्राप्त आदेश प्रत ---"---

ड] प्रवासभत्ता पतपत्र नोंदवही. ---"---

ड] महाराष्ट्र दर्शन

अ] मंजूर आदेश प्रती. १/७/२००२ ते ३१/१२/२००५

ब] गोषवारा प्रत ---"---

क] अनुदाना मागणी पतपत्र प्रती ---""---

ड] मा. कार्यकारी अभियंता यांची व प्रवास भत्ता देयके व लॉकबुकची कॉपी प्रत सन १/७/२००२ ते ३१/१२/२००५ पर्यंत

भांडार शाखा.

अ] दिं. १/७/२००२ ते ३१/१२/२००५ अखेर विभाग व उपविभागात असलेल्या प्रत्येक वाहनांचा प्रत्येक महिन्याचा ~~खर्च मेळ~~ खर्चाच्या प्रती तसेच शासन मान्य शासन निर्णय प्रत. किंवा मंडळ कार्यालयाचे पत्र इ. प्रती मिळावेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

| अॅ. कार | अंदाजपत्र रक्कम | मंजूर इंधन | वापरलेले इंधन | सुटेभाग | दुरुस्ती | जादा वापरण्यात आलेले इंधन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | :जादा इंधन वापरलेलेबाबत खर्चाचे मंजूरी मंडळ कार्यालयाचे पत्र क्रं. |
| २] जीप सर्व उपविभाग | | | | | | |

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

दुष्काळात अॅ. कार एमएक्सओ-७६७७ ची (क्रुझर) दुरुस्ती केलेल्या कार्यपध्दतीची कागदपत्र उदा. मंजूर पत्र क्रं. निविदा क्रं. कोटेशनच्या प्रती. तुलनात्मक विवरणपत्र दुरुस्ती आदेश चेक नं. एजेन्सी चेक नं. दिनांक. इत्यादी. (हस्तलिखित: ... ०१/२५ ...)

१] कार्यालयीन वापरासाठी घेतलेल्या फॉर्म पध्दतीच्या झेरॉक्स प्रती दि. २००२ ते २००५.

अ] कोटेशन मागणी केलेल्या प्रती जाहिरात पेपर

ब] तुलनात्मक तक्ता

क] ऑर्डर

ड] ~~दिलेल्या चेकचा क्रमांक दिनांक दलालाचे नांव इ.~~

निवासस्थान वाटप व वसुली.

अ] ~~मिळि~~ निवासस्थान वाटप जेष्ठता सुची नोंदवही वर्ग१ , २, ३, ४ [कायम/तात्पुरते] दि. १/७/२००० ते ३१/१२/२००५

ब] निवासस्थान वाटप दिनांक १/७/२००० ते ३१/१२/२००५ कार्यालयीन आदेश

क] श्री. एच. डी. राऊत भांडार पाल यांचे निवासस्थानाबाबतचा संपूर्ण पत्रव्यवहार जुलै-९४ ते आतापर्यंत, वसुली आदेश प्रत, वसुली बंद आदेश प्रत, पुन्हा वसुली चालू आदेश/पत्र प्रत. मिळावी.

ड] शासकीय निवास्थान वसुलीबाबतचे शासन निर्णय प्रत जाने. २००० ते ३१/१२/२००५.

इ] श्री. ~~हेमंमाडे,~~ हेमाडे मजूर व अभिमन्य शिंदे यांना देण्यांत आलेले वेतन माहे ७/२००२ ३१/३/२००५. मा. कार्यकारी अभियंता यांना शासनाचे मजूर घरी वापरणेत येतात याबाबत शासनाचे निर्णयाची प्रत.

ई] अतांत्रिक कर्मचा-यांची कार्यविवरण झेरॉक्स प्रत [फक्त पत्रव्यवहार शाखा व लेखाशाखा) आकेसर्म २००२ ते ३१/१२/२००५ अखेर

फ] अतांत्रिक कर्मचा-यांना देण्यांत आलेले संगणक अग्रिम यादी. पास झाले नसल्यास वसूल तक्ता प्रती. जाने. २००२ ते ३१/१२/२००५ अखेर.

फ) श्री. ए. जी. गावळी वरिष्ठ लिपिक यांना देण्यात आलेल्या पदोन्नती आदेश क्र., सविस्तर पदस्थापना आदेश.

श्री ए. जे. गावळी क. लि. यांचे उपकी कालावधि विभाग क्र १ (मंगळवेढा) मुक्त आदेश बदली आदेश, तसेच उ. क्र. विभाग क्र ५ पंढरपूर कडे झालेली बदली रद्द आदेश, बदली रद्द करणे बाबतचा प्रस्ताव (मंडळ) झेरॉक्स प्रती मिळावी

ग) श्री गिरजाप्पे क. लि. वरीलप्रमाणे.

ड) श्री ... श्री. ... साहेब का. अ. यांचे कारवाईची नोटीस झेरॉक्स (कार्यालयीन रजा) प्रती. मिळाव्यात प्रती मिळावेत.

अर्जदाराची स्वाक्षरी
[illegible]
२५/६/२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. हरकचंद माणिकलाल खाबिया
१४९, मारुती आळी, शिरुर, जि. पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्याधिकारी,
शिरुर नगरपरिषद, जि. पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** नगर अभियंता,
बांधकाम विभाग, शिरुर नगरपरिषद, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१४ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.१२.२००८ व ३०.१२.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.२.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.६.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - नगर परिषद क्षेत्रातील बेकायदा बांधकामे व फौजदारी गुन्हे, नोटिसा इ. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. हरकचंद माणिकलाल खाबिया यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलिय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.२५-०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर लेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १२२४/ २००९/ कोल्हापूर | श्री. दिपक शंकरराव चव्हाण कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर | कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा निर्णय मान्य नसल्याने तो रद्द करणेसाठी व्दितीय अपील दाखल केले आहे | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक मुद्रांक शुल्क (रु.२०/-) जोडलेले नाही. |
| २. | १२७७/ २००९/ कोल्हापूर | श्री. जगन्नाथ मारुती संकपाळ मु. पो. माले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | ग्रामविकास अधिकारी, मु. पो. माले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती पन्हाळा, जि. कोल्हापूर | आवश्यक कागदपत्रांअभावी मूळ माहिती अर्जातील मागणीचा बोध होत नाही. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्र जोडलेली नाहीत |
| ३. | १३२८/ २००९/ कोल्हापूर | श्री. महावीर जिन्नापा धोजे १२/८००, भोजेमळा, गुरुलानन नगर, इचलकरंजी. जि. कोल्हापूर | निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय हातकणंगले, जि. कोल्हापूर | तहसीलदार कार्यालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर | इचलकरंजी दिवाणी कोर्ट रे. मु. नं. २०२/९८ निकाल तारीख १-७-२००१ च्या निकालानुसार केलेल्या | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक मुद्रांक शुल्क (रु. २० /-) जोडलेले नाही तसेच अपिलासोबत सादर केलेल्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | हुकुमनाम्या नुसार केलेल्या कार्यवाही बाबत. | कागदपत्रावरुन प्रथम अपील केलेले दिसून येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपिल क्र. १२२४/२००९/कोल्हापूर, १२७७/२००९/कोल्हापूर व १३२८/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३०-०९-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२३१/ २००९/ सातारा | श्री. संजय बबनराव किकले मु. पो. तरडगाव, ता. फलटण, जि. सातारा | सचिव, पद्मभूषण वसंतदादा पाटील सहकारी पतसंस्था, मु. पो. तरडगाव, ता. खंडाळा, जि. सातारा | सहायक निबंधक, सहकारी संस्था, मु. पो. . तरडगाव, ता. फलटण, जि. सातारा | मार्च २००८, एप्रिल २००८ ते फेब्रुवारी २००९ अखेर हिशेब पत्रके, ऑडीट रिपोर्ट शेअर्सधारकांची यादी इ. माहिती | मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठने रिट पिटीशन क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहाकरी बँकांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. तथापि नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे ती त्यांनी देणे बंधनकारक आहे. |
| २ | १२८२/ २००९/ सातारा | नानासो आप्पासो निगडे मु. पो. तडवळे, ता. फलटण, जि. सातारा | जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ फलटण आगार, सातारा विभाग, मु. पो. फलटण जि. सातारा | विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सातारा विभाग, सातारा | दि ११-१२-२००८, दि २९-१२-२००८, दि १५-०२-२००९, दि १९-०२-२००९ व दि २३-२-२००९ रोजी संपूर्ण दिवसात उशिरा धावलेल्या बसेस या बाबतचा तपशिल यासह एकूण | अपीलकर्त्याने दोन वेगवेगळया माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दोन अर्जातील अ. क्र. ०१ व ०३ या मुद्दयांची माहिती | |
| ३ | १२८४/ २००९/ सातारा | श्री जाकीर हुसेन इनामदार १२ ब, डॉ. बापूजी साळुंखे नगर, शिवराज पेट्रोल पंपाजवळ, सातारा | जन माहिती अधिकारी, आय. डी. बी. आय. बँक लि., आय. डी. बी. आय. टॉवर डब्ल्यु टी. सी. कॉम्पलेक्स, कफपरेड मुंबई - ४००००५ | अपिलीय प्राधिकारी, आय. डी. बी. आय. बँक लि., आय. डी. बी. आय. टॉवर डब्ल्यु. टी. सी. कॉम्पलेक्स, कफपरेड मुंबई - ४००००५ | जोशीज् टेस्टी फुडस् प्रा. लि. यांनी बँकेकडे केलेल्या कर्जमागणीच्या विनंती अर्जाची प्रत व कर्जाबाबत बँकेचा पडताळणी अहवालाची प्रत | आय.डी. बी. आय. बँक ही राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. अपीलकर्त्यांने आवश्यक तर केंद्रिय माहिती आयोगाकडे अपील दाखल करावे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण ३ अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र.१२३१ / २००९ / सातारा, १२८२/ २००९ / सातारा व १२८४/ २००९ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०९-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर
रा. जांभूळवाडी रोड, दत्तनगर, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (जि.घ) — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा जनता संपर्क अधिकारी,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३२/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर
रा. जांभूळवाडी रोड, दत्तनगर, ता.हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सेवकवर्ग विभाग अधिकारी,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिवाजी भिकाजी दौंडकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

स्मृती वनात जे दहा लोक घेतले होते त्या लोकांची बजेट प्रत, त्यांच्या सर्व्हीस फाईल, श्री. यशवंत शिवराम खैरे यांची सर्व्हीस फाईलची प्रत, तसेच श्री. खैरे यांना एकाच पदावर एवढ्या वर्षे का ठेवण्यात आले त्याची माहिती

## विवेचन

स्मृती वनातील कमी केलेल्या सेवकांना कामावर घेण्याच्या संदर्भात आपण पुणे महानगरपालिका आयुक्तांकडे केलेल्या अर्जांच्या संदर्भात मागितलेली माहिती मिळत नसल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१६.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

स्मृती वनातील किती कर्मचा-यांना घेतले व राहिलेल्यांना का घेतले नाही, याबाबतची माहिती आपण सातत्याने मागत आहोत, परंतु ती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री. कोळेकर यांनी केले. स्मृती वनातील १० बिगारी सेवकांना महानगरपालिकेच्या सेवेत घेतले व श्री. कोळेकर यांना घेतले नाही. आपल्याला महानगरपालिकच्या सेवेत घ्यावे, या मागणीसाठी ते सातत्याने अर्ज करीत असून महानगरपालिका आयुक्तांकडे केलेले अर्ज तसेच आहेत. सेवेत घेण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे श्री. कोळेकर यांना वारंवार स्पष्ट करण्यात आले असून वेळोवेळी या अनुषंगाने मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी श्री. शिवाजी भिकाजी दौंडकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भरत दिगंबर ओवाळ
सर्कल नं.२, बरॅक-९, यू.टी.४३१,
येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद, पुणे-१
(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, नेहरु शिक्षण संस्था, पुणे-३७

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी मुख्याध्यापक,
नेहरु शिक्षण संस्था, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३३ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७ . ७ .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भरत दिगंबर ओवाळ
सर्कल नं.२, बरॅक-९, यू.टी.४३१, येरवडा मध्यवर्ती कारागृह, येरवडा, पुणे-६

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ कार्यालय,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, महानगरपालिका, पुणे-५ प्रतिनिधी श्री.अनंता खंडागळे

| | |
|---|---|
| (२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.एम.एन.मांढरे<br>(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, नेहरु शिक्षण संस्था, पुणे-३७ श्री.संभाजीराव कुंजीर | |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>फेब्रुवारी २००६ ते आजमितीस निलंबनकाळाचा निर्वाह भत्ता ५० टक्के व ७५ टक्के प्रमाणे अदा केलेला नाही. |

## <u>विवेचन</u>

आपण कारागृहात असताना निर्वाह भत्ता व निर्दोष मुक्त होईपर्यंतचे वेतन मिळालेले नाही, ते मिळावे अशी मागणी अपीलकर्ता श्री.भरत दिगंबर ओवाळ यांनी केली होती. श्री.ओवाळ हे ४८ तास कारागृहात असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा भत्ता व वेतन देता येणार नाही, असे संस्थेचे अध्यक्ष श्री.संभाजीराव कुंजीर यांनी कळविले. त्याविरुध्द श्री.ओवाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण निर्दोष मुक्त झालो असून दि.७.१२.२००७ पासून मुख्याध्यापकपदी पुन्हा रुजू झालो आहोत. १९ महिन्यांचा निर्वाहभत्ता व दोन महिन्यांचे वेतन आपल्याला मिळालेले नाही, असे श्री.ओवाळ यांनी दि.१७.८.२००७ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु शिक्षण संस्था यांना आपण त्याचवेळी कळविले असल्याचे व ती दिल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी सांगितले. वेतन व भत्ता न देण्याबातचे पूर्वी नमूद केलेले कारणच त्यांनी नमूद केले.

निर्वाह भत्ता अथवा वेतन मिळण्याची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा विचार करता येणार नाही. सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२३६/ २००९/ सोलापूर | श्री. शंकर गुंडिबा भिसे १३०१, भिसे प्लॉट, सुभाषनगर, बार्शी, जि. सोलापूर | उपवन संरक्षक, सोलापूर | वन संरक्षक, पुणे विभाग,पी. एम. टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे | जाहिरातीची प्रलंबित बिले अदायगी करण्याच्या पध्दतीची माहिती. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | १२७६/ २००९/ सोलापूर | प्रा. अनंत भानुदासराव विद्यासागर त्रिमूर्ती हौसिंग सोसायटी, कुर्डुवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर | प्राचार्य, बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी, जि. सोलापूर | विभागीय शिक्षण सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | अपीलकर्त्याने अपिलासोबत जोडपत्र 'अ' व 'ब' जोडले नसल्याने मूळ माहितीचा बोध होत नाही. | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण २ अपिले अनुक्रमांक १ व २ (अपील क्र. १२३६/२००९/सोलापूर व १२७६/२००९/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.२४.०९.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
अप्पर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, बंगला क्र.५, मुंबई-पुणे रस्ता, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
अप्पर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, बंगला क्र.५, मुंबई-पुणे रस्ता, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीखं | दि. १७ . २ .२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
अप्पर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, बंगला क्र.५, मुंबई-पुणे रस्ता, पुणे
श्री.बा.व.वाघ

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
अप्पर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, बंगला क्र.५, मुंबई-पुणे रस्ता, पुणे
श्री.अे.अे.कुंभार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.४.१०.२००६ ते २१.१२.२००६ या काळातील बारामती तालुका सुरक्षा रक्षक व कामगार संघटना, पिंपळी ता.बारामती या संघटनेने केलेल्या आंदोलनाबाबत. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

बारामती ग्रेप इंडस्ट्रीज लि. यांच्याकडील कामावरुन कमी केलेल्या सुरक्षा रक्षकांच्या संदर्भातील माहिती प्रथम दिली नाही. सहा महिन्यांनी दिली, ती दिशाभूल करणारी दिली व त्यानंतर शुल्क भरण्यास कळविले, सुरक्षा रक्षकांच्या जीवनमरणाशी निगडीत असा विषय आहे, हे लक्षात घेऊन त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे यांनी केली.

तत्कालीन सुरक्षा मंडळाशी निगडीत असा हा विषय आहे. त्याबाबतचे उत्तर त्यांना विहित मुदतीत देण्यात आले. त्यानंतर त्यांना शुल्क भरण्यासाठी विहित मुदतीत व नंतर चार पत्रे पाठविण्यात आली. दरम्यान त्यांनी दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला सादर केला, परंतु तो साक्षांकित नसल्यामुळे ग्राह्य धरता येणार नाही, असेही त्यांना कळविण्यात आले. हा विषय ते सातत्याने मांडत आले असून वेळोवेळी त्यांना उत्तरे देण्यात आली आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, पुणे श्री.अे.अे.कुंभार यांनी केले.

श्री.बनसोडे यांनी केलेल्या अर्जात अनेक बाबींचे खुलासे विचारले आहेत. अशा प्रकारची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती ठरत नाही. मात्र मूळ प्रश्न

लक्षात घेऊन त्या अनुषंगाने आठ दिवसात त्यांना माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

श्री.बनसोडे यांनी प्रथम अपील केलेले नाही, दारिद्र्यरेषेखालील दाखल्याची साक्षांकित प्रतही दाखल केलेली नाही व शुल्कही भरलेले नाही. दोन्हीपैकी एकाची पूर्तता केल्यास त्यांना देय माहिती देण्यात येईल, असा अहवाल श्री.वाघ यांनी दि.२३.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला आहे. माहिती आवश्यक असल्यास श्री.बनसोडे यांनी त्याप्रमाणे पूर्तता करावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. नरहर दिनकर खोमणे
मु. माळेवाडी (भाऊसाहेब नगर), पो. ता. दौंड
जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४८/२००९/ पुणे |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२-८-२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८-९-२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - राज्य मंडळ, पुणे कार्यालयातील बदल्या झालेल्या कर्मचाऱ्यांचे नाव,पद, नियुक्ती दिनांक, मूळ वेतन, एकूण पगार, बढती दिनांक इ. संपूर्ण माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. नरहर दिनकर खोमणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करने शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे..

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०-०६-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र मोतीरामजी निचत
बिल्डिंग नं.ए-१३, फ्लॅट नं.प्र-३,
प्लॅनेट मिलेनियम हौसिंग सोसायटी, औंध कॅम्प, पुणे-४११०२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन, पुणे-४४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्राचार्य,
पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन, पुणे-४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५३ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन, पुणे-४४ प्रा.व्ही.एस.बॅकोड

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्राचार्य,
पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन, पुणे-४४ श्री.बी.व्ही.माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.७.२००७, १७.७.२००७, १७.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.५.२००८ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.डी.बी.लिमये हे मान्यताप्राप्त प्राचार्य होते का, असल्यास डी.टी.ई.चे मान्यतापत्राची प्रत, पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतनमध्ये प्राचार्य म्हणून हजर होताना त्यांचे वय काय होते, श्री.आर.एम.निचत यांच्या गैरवर्तणुकीबाबत श्री.लिमये यानी सादर केलेल्या अहवालाची प्रत. |
|---|---|

## विवेचन

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन, निगडी मधून केलेल्या आपल्या निलंबनाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन, निगडी व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन, निगडी यांनी दिली नाही, या कारणावरुन अपीलकर्ता श्री.राजेंद्र मोतीराज निचत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. सन १९९४ पासून सन २००५ पर्यंतची माहिती विविध अर्जांद्वारे मागितली आहे. त्या सर्व अर्जांबाबत एकच अपील त्यांनी आयोगाकडे केले आहे.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स अपीलकर्ता गैरहजर होते. आयोगाने घेतलेल्या सुनावणीसही ते गैरहजर होते. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतनमध्ये आपण सलग साडेबारा वर्षे अधिव्याख्याता या पदावर सेवा करुनसुध्दा कोणतेही संयुक्तिक कारण न देता आपल्याला सेवेतून निलंबित केले, त्यामुळे आपण ही माहिती मागत आहोत, असे श्री.निचत यांनी अपील अर्जात म्हटले आहे. हे तंत्रनिकेतन विनाअनुदानित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्याला लागू होत नाही, अशी आपली धारणा आहे. याबाबत असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंटस् ऑफ पॉलिटेक्निक्स यांनी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे बाजू मांडली आहे. त्यांच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.व्ही.माने व अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.एस.बॅकोड यांनी 'विशेष अपील निर्गतकार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. कायदा लागू होत नसला तरी सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे, असे प्रतिपादन त्यांनी सुनावणीत केले.

विनाअनुदानित तंत्रशिक्षण संस्थांनाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, हे शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने पूर्वीच स्पष्ट केले आहे, त्या स्थितीत, आपल्या तंत्रनिकेतनाला हा कायदा लागू होत नाही, हे प्राचार्य, उपप्राचार्य यांचे निवेदन अमान्य करण्यात येत आहे. मात्र माहिती दिल्याचे निवेदन त्यांनी केले असल्याचे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. एस. चंदर
८०१, आशियाना, सिव्हिल कोर्ट समोर,
उल्हासनगर, जि. ठाणे-४२१ ००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व
करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विलास कानडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व
करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामदास बापू जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>अपील नं.३०/१९८४ व किरकोळ अपील नं. ३२०/१९८५ चे अपील मेमोची प्रत व लेखी म्हणणे, निकालपत्र इ. च्या प्रती |

## विवेचन

मौजे गुलटेकडी, पुणे येथील 'श्री' बंगल्याच्या करपात्र मूल्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या दाव्याच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. एच.चंदर यांनी मागितली होती. आपला अर्ज व प्रथम अपील याबाबत कोणतेच उत्तर न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. चंदर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. त्यात त्यांनी आपला ई-मेल पत्ता दिला असून त्यावर पत्रव्यवहार करण्याचे नमूद केले आहे.

दि. १६.७.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला व दि.१२.८.२००९ रोजी आयोगापुढील सुनावणीला श्री. चंदर उपस्थित नव्हते.

श्री. चंदर यांचा अर्ज अथवा प्रथम अपील संबंधित कार्यालयांना मिळाले नाही, त्यामुळे कार्यवाही करता आली नाही. न्यायालयातील निकालाबाबतची माहिती त्यांना हवी असल्याचे अर्जावरुन दिसते, ती त्यांनी न्यायालयाकडून घेणे आवश्यक आहे. त्यांनी दिलेल्या ई-मेल पत्यावर केलेल्या मेलला उत्तर प्राप्त झाले नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिरीष रामदास सरोदे
१-बी,१३, विश्रांतीनगर,विठ्ठलवाडी, पुणे सिंहगड रोड,
हिंगणे खुर्द, पुणे-४११ ०५१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता (प्रकल्प),
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७५ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शिरीष रामदास सरोदे
१-बी,१३, विश्रांतीनगर,विठ्ठलवाडी, पुणे सिंहगड रोड,
हिंगणे खुर्द, पुणे-४११ ०५१

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता (प्रकल्प),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विजय दहिभाते
उप आयुक्त, विभाग क्र.१

**जन माहिती अधिकारी** तथा अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. जयंत भोसेकर, क्षेत्रिय अधिकारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन मा--हती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

भुसारी कॉलनी,पुणे येथे पुणे महानगरपालिकेने वहिवाटीचा रस्ता नसताना अनधिकृतपणे डांबरीकरण केले आहे, असे अपीलकर्ता श्री. शिरीष रामदास सरोदे यांचे म्हणणे असून त्या अनुषंगाने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. ती मिळाली नाही, या कारणावरुन श्री. सरोदे यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. संबंधित रस्त्याबाबतची फाईल श्री. सरोदे यांना दाखवून त्यातील आवश्यक असलेली माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. श्री. सरोदे यांनी मागविलेली माहिती विकास अभियंता (पथ) श्री.लाटकर यांनी टपालाद्वारे पाठविणे आवश्यक होते, परंतु पाठविलेली नाही, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात नमूद करण्यात आले असून वेळेवर उत्तर पाठविण्याची दक्षता घेण्याची सूचना देण्यात आली आहे.

दि. १६.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आपण एकूण पाच अर्ज केले होते. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी आपल्याला माहिती देण्यात आली. संदर्भाधीन रस्ता वहिवाटीचा आहे, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे चुकीचे आहे. त्याबाबत त्यांच्याकडे कोणताही पुरावा नाही व आपल्याकडे हा रस्ता वहिवाटीचा नसल्याबाबतची कागदपत्रे आहेत, असे प्रतिपादन श्री.सरोदे यांनी केले.

श्री.यादव यांचा अर्ज दि.१८.११.२००६ चा होता. दि.३०.११.२००६ ला त्यांना माहिती देण्यात आली. रस्ता वहिवाटीचा आहे किंवा नाही, याबाबत अभियत्यांनी पाहणी करुन अहवाल

श्री सरोदे यांना माहिती देण्यात आली आहे. रस्ता वहिवाटीचा होता किंवा नाही, व महानगरपालिकेने अनधिकृतपणे रस्ता बांधला आहे काय ? याचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात विकास अभियंता (पथ) श्री. लाटकर यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याचा उल्लेख केला आहे. त्याबाबत श्री. लाटकर यांचा लेखी खुलासा सादर करण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. संबंधित विषयाबाबत आपण जन माहिती अधिकारी नव्हतो. अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प ) हे त्यावेळी जन माहिती अधिकारी होते. पथ विभागामार्फत प्रथम अपिलाच्या सुनावणी पूर्वीच श्री. सरोदे यांना माहिती पाठविण्यात आली होती व तसे अपिलीय प्राधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाची माहितीही आपल्याला आयोगाच्या सुनावणीनंतरच कळली, असा खुलासा श्री. लाटकर यांनी दि.१८.८.२००९ च्या निवेदनान्वये आयोगाला सादर केला. तो पाहता महानगरपालिकेत विविध विभागांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कार्यवाहीबाबत अधिक समन्वय असण्याची गरज स्पष्ट होते, याची दखल महानगरपालिका आयुक्तांनी घेणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९ .९.२००९**



**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अंगद नरसिंहराव भोसले
द्वारा-पवार, स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगाव शेरी, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.७.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अंगद नरसिंहराव भोसले
द्वारा-पवार, स.नं.५३/५८, साईनाथनगर, वडगाव शेरी, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री.आर.ए.इथापे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ श्री.आर.बी.अभिमाने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.५.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुनर्मूल्यांकन आदेश प्राप्त करण्यासाठी-महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे पत्र क्र.मशपप/डीएड/ड-१/प/४७३, दि.२१.२.२००६ व पत्र क्र.मशपप/अध्यक्ष-स्वीस/ ५६०/२००६, दि.२७.२.२००६ च्या पत्रांच्या सत्यप्रती. | |

## विवेचन

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या दोन पत्रांच्या सत्यप्रती अपीलकर्ता श्री.अंगद नरहरीराव भोसले यांनी मागितल्या होत्या. ही पत्रे गोपनीय स्वरुपाची असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी नाकारली, अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य ठरवून अपील निकाली काढले. आपल्याला चुकीची माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री.भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना शास्ती करावी, असे श्री.भोसले यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. पुनर्मूल्यांकनाचे आदेश शासनाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्याला या पत्रांच्या प्रती आवश्यक होत्या. शासनाला व विधिमंडळाला दिली जाणारी ही माहिती असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार आपल्यालाही ती मिळाली पाहिजे, असे श्री.भोसले यांनी नमूद केले.

नोव्हेंबर २००५ मध्ये डी.एड. परीक्षेला बसलेल्या उमेदवारांच्या मागणीप्रमाणे उत्तरपत्रिकांची पुनर्तपासणी करण्यासाठी शासनाची मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भित

पत्रान्वये शासनाला सादर करण्यात आलेला होता. विश्वासाश्रित संबंधातून केलेला हा पत्रव्यवहार असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(ई अन्वये माहिती नाकारली, मात्र दि.२१.२.२००६च्या या पत्रानुसार उमेदवारांच्या मागणीप्रमाणे उत्तरपत्रिकांची पुनर्तपासणी करण्याबाबतचे आदेश शासनाने निर्गमित केले. त्याप्रमाणे परीक्षा परीषदेने उत्तरपत्रिकांची पुर्नतपासणी करुन संबंधित विद्यार्थ्यांना सुधारित निकाल देण्यातही आलेला आहे. विद्यार्थी संघटनानी याबाबत आंदोलन केले होते. याबाबत शासनाला केलेल्या शिफारशी पाहता अपीलकर्त्याने माहिती मागण्यापूर्वीच निर्णय झालेला असल्याने परीक्षाविषयक चालू कामकाजाचा विचार करुन पत्रांच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या नाहीत, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे श्री.आर.ए.इथापे यांनी आयोगाला सादर केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लावलेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(१)(ई) चा अन्वयार्थ चुकीचा आहे, संबंधित पत्रांच्या प्रती त्यांनी अपीलकर्त्यास देणे आवश्यक होते. मात्र त्या नाकारण्यामागची मूळ प्रश्न सोडविण्याच्या संदर्भातील भूमिका लक्षात घेता, सद्हेतूने केलेली कृती असल्यामुळे शास्ती लावण्यात आलेली नाही. मात्र यापुढे अशा प्रकारे चुकीच्या अन्वयार्थातून माहिती नाकारली जाऊ नये, याची समज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे श्री.आर.बी.अभिमाने व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे श्री.आर.ए.इथापे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .९.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर,
जि. पुणे - ४१२४०३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०१ / २००९ / पुणे |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.६.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - श्री संत कान्हुराज ग्रामीण बिगरशेती पतसंस्था मर्यादीत, केंदूर, ता. शिरुर या संस्थेबाबतची माहिती. | |

### विवेचन

अपीलकर्ता श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि. ३० -०९ -२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सचिन दिनकर साबळे
चंद्रमणीनगर हौसिंग सोसायटी, आमराई, बारामती — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, विद्याप्रतिष्ठानचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी, विद्याप्रतिष्ठानचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०५ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७. ७ .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सचिन दिनकर साबळे
चंद्रमणीनगर हौसिंग सोसायटी, आमराई, बारामती

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, विद्याप्रतिष्ठानचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती, जि.पुणे
डॉ.अरुण दिगंबर अडसूळ

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी, विद्याप्रतिष्ठानचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, विद्यानगरी, बारामती, जि.पुणे
श्री.विजय ज्ञानदेव रसाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कॉलेजमध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा, शर्तीबाबत. कर्मचारी वेतनेतर उत्पन्न संस्थेच्या किंवा महविद्यालयाच्या परवानगीशिवाय मिळवू शकतो का, मिळवीत असेल तर त्याच्यावर कोणती कारवाई केली जाते व किती दिवसात, कर्मचारी संस्थेच्या किंवा महाविद्यालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय सहकारी संस्थेवर संचालक किंवा सचीव हे पद धारण करु शकतो काय, धारण करीत असल्यास त्याच्याविरुध्द कोणती कारवाई केली जाते, कर्मचाऱ्याबद्दल वर्तमानपत्रात भ्रष्टाचाराचे आरोप झाले असल्यास व त्यात संस्थेचे किंवा महाविद्यालयाचे नाव आल्यास कोणास जबाबदार धरावे, कर्मचाऱ्यांकडून घेतलेल्या हमीपत्राच्या व प्रतिज्ञापत्राच्या नकला, सहकार अधिनियमानुसार सचीव पद निमशासकीय वेतनधारी आहे. हे पद एकच व्यक्ती महाविद्यालय प्राध्यापक व पतसंस्थेत सचीव असे दोन पगार घेत असेल तर त्याच्यावर संस्था किंवा महाविद्यालय कोणती कारवाई करते? | |

## विवेचन

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनेतर उत्पन्नाच्या अनुषंगाने सात मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.सचिन दिनकर साबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्याकडे मागितली होती. अर्जानंतर एक आठवड्यात श्री.साबळे महाविद्यालयात व्यक्तिशः आले तेव्हा सर्व प्रश्नांची उत्तरे दिली व त्यांच्या मागणीनुसार विहित मुदतीत लेखी उत्तर पाठविले, असे जन माहिती अधिकऱ्यांनी कळविले. त्याविरुध्द आपण केलेल्या अपिलाची तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य अरुण दिगंबर अडसूळ यांनी दखल घेतली नाही व कायदेशीर कारवाईची धमकी दिली, या कारणावरुन श्री.साबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

या अपिलाबाबत दि.१७.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

सातपैकी एकाच मुद्दयाचे उत्तर आपल्याला दिले. अन्य मुद्दयांची माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.साबळे यांनी केले. श्री.साबळे यांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्यात आली असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतपेढी चालवितात अशी त्यांची माहिती आहे. परंतु त्याबाबतचे उत्तर आपण दिले आहे. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांवर त्यांनी आरोप केलेले असल्यामुळे ते सिध्द करावेत, अन्यथा योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पत्र त्यांना पाठविले, असे प्राचार्य अडसूळ यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याला मुद्देनिहाय उत्तर दोन दिवसात द्यावे, असा मौखिक आदेश आयोगाने दिला. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली.

श्री.साबळे यांच्या अर्जात कल्पित स्वरुपाचे प्रश्न व त्याबाबतची संभाव्य कारवाई अशी माहिती विचारलेली आहे. (उदा. मुद्दा.क्र.५-सह.संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यासंबंधी भ्रष्टाचार किंवा बेकायदेशीर कार्यपध्दतीबाबत वृत्तपत्रामध्ये आरोप झाल्यास सदर आरोपास महाविद्यालय किंवा संस्थेचे नाव आल्यास कोणास जबाबदार धरावे.) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशा प्रकारची विचारणा 'माहिती' ठरत नाही.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ .९.२००९**